# ग्रंथालय माहिती

महाराष्ट्र विधानमंडळाच्या ग्रंथालयाची स्थापना १८ मार्च, १९२२ रोजी झाली. सन १९१९ च्या कायद्याप्रमाणे १९२१ साली त्यावेळच्या मुंबई प्रांताचे पहिले लोकनियुक्त कायदेमंडळ अस्तित्वात आले व विधानमंडळ सदस्यांच्या माहितीसंबंधीच्या अनेकविध गरजा भागविण्यासाठी व वेगवेगळे कायदे करताना आवश्यक ते सर्व संदर्भसाहित्य, माहिती उपलब्ध करून देण्यासाठी या ग्रंथालयाची स्थापना झाली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे ग्रंथालय हे समृध्द व सुसज्ज असून ते पुर्णत: वातानुकुलित आहे. विधानभवनाच्या इमारतीमध्ये ५ व्या व ६ व्या मजल्यावर ते व्यवस्थापित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील हे एक महत्त्वाचे व विशेष स्वरूपाचे संदर्भ ग्रंथालय असून प्रामुख्याने केवळ विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांसाठी आहे. मात्र, विशेष अभ्यासक, संशोधक, वृत्तपत्रांचे प्रतिनिधी यांना संदर्भसेवा व अन्य प्रकारच्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध होऊ न शकणारी अशा स्वरूपाची विधिमंडळामधूनच मिळू शकणारी माहिती मागणीनुसार अन्य कोणालाही या ग्रंथालयामधून दिली जाते. विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांना लागणारी पुस्तके, सभागृहाच्या मागील कामकाजाची कार्यवाहीवृत्ते (Debates), अहवाल, वृत्तपत्रांतील विविध विषयांवरील महत्त्वाच्या बातम्या व लेखांची कात्रणे तसेच, नियतकालिकांतील लेख इत्यादी माहिती सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार पुरवून त्यांची संसदीय कर्तव्ये व जबाबदाऱ्या परिणामकारकरित्या व समाधानकारकपणे पार पाडण्यास त्यांना सहाय्य करणे हा या ग्रंथालय सेवेच्या व्यवस्थेमागील प्रमुख उद्देश आहे.